महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९६ वे | दिनांक : १०/०७/२०२६ | वार : शुक्रवार

## आदित्य ठाकरेंचा फडणवीसांवर हल्लाबोल: राम मंदिराच्या दानपेटीवरून भाजपला घेरले



**मुंबई :** शिवसेना (ठाकरे गट) नेते आदित्य ठाकरे यांनी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना भाजप आणि राज्य सरकारवर जोरदार टीका केली. राम मंदिरातील कथित चोरीच्या प्रकरणापासून ते पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रण, महागाई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधानसभेतील भाषण आणि विरोधकांवरील दबाव अशा अनेक मुद्द्यांवर त्यांनी सरकारला लक्ष्य केले.

राम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराचा संदर्भ देत आदित्य ठाकरे म्हणाले, "जे लोक राम मंदिरालाही लुटू शकतात, दानपेटीही सोडत नाहीत, त्यांच्यासोबत भांडीला मांडी लावून बसणार का?" असा थेट सवाल त्यांनी भाजपसोबत जाण्याच्या चर्चेत असलेल्या नेत्यांना केला.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) महायुतीत सहभागी होण्याच्या चर्चांबाबत विचारले असता आदित्य ठाकरे म्हणाले की, तो निर्णय संबंधित पक्षाचा आहे. "आम्ही आमची भूमिका नेहमी स्पष्ट आणि परखडपणे मांडत आलो आहोत. आम्ही जनतेच्या बाजूने उभे आहोत," असे त्यांनी सांगितले.

राज्यातील परिस्थितीवर टीका करताना त्यांनी महागाई, पाणीटंचाई, वीज कपात यांसारख्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले. "देशभरात लोक आता उघडपणे बोलू लागले आहेत. जनतेचा राग व्यक्त होत आहे. अशा वेळी भाजपसोबत जाण्याचा विचार करणाऱ्यांनी जनतेसमोर उत्तर द्यावे," असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभेतील भाषणावरही आदित्य ठाकरे यांनी टीका केली. "काल दोन तासांहून अधिक वेळ भाषण करून त्यांनी विरोधकांवर टीका केली, पण त्यातून त्यांचे फ्रस्ट्रेशन स्पष्ट दिसत होते. अनेकदा अहंकार हा फ्रस्ट्रेशनचे लक्षण असतो," असा टोला त्यांनी लगावला.

यावेळी त्यांनी पुन्हा एकदा राजकीय अंदाज व्यक्त करत, "कदाचित हे त्यांचे मुख्यमंत्री म्हणून शेवटचे अधिवेशन असेल. त्यांना दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात नेले जाऊ शकते," असेही म्हटले.

मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत विरोधकांना दिलेल्या इशाऱ्यावरही आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली. "लोक प्रश्न विचारणारच. भ्रष्टाचार झाला असेल, अनियमितता झाली असेल तर त्याची उत्तरं द्यावी लागतील. महाराष्ट्राला धमकावून चालणार नाही. हिंदीत, इंग्रजीत किंवा कोणत्याही भाषेत धमक्या दिल्या तरी आम्ही प्रश्न विचारत राहू," असे त्यांनी स्पष्ट केले.

भाजपवर अधिक आक्रमक होत आदित्य ठाकरे म्हणाले, "आम्ही भाजपसोबत जाणार नाही. कितीही दबाव आणला तरी आमची भूमिका बदलणार नाही. भाजप हिंदूंच्या आणि देशहिताच्या विरोधात काम करत आहे," असा गंभीर आरोप त्यांनी केला.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाच्या धोरणावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. "इथेनॉलमुळे पेट्रोल स्वस्त होईल, असे आश्वासन दिले गेले होते. पण आज आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती कमी असूनही भारतात पेट्रोल-डिझेल स्वस्त झालेले नाही. जगभर इथेनॉल ब्लेंडिंगबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तरीही हे धोरण रेटले जात आहे," असे ते म्हणाले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामावरूनही त्यांनी सरकारवर निशाणा साधला. "१०-१२ वर्षांपासून हा महामार्ग पूर्ण झालेला नाही. आधी रस्ता नीट करून दाखवा. नाहीतर त्या खड्ड्यांमध्येच इथेनॉल टाकून ते बुजवण्याचा प्रयत्न करा," असा उपरोधिक टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला.

## 'लोकराज्य'तील चुकीवरून विधानसभेत गदारोळ

**मुंबई :** राज्य सरकारच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या अधिकृत 'लोकराज्य' मासिकात एक अत्यंत गंभीर प्रकार समोर आला आहे. या मासिकात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आणि त्यांना मिळालेल्या 'भारतरत्न' पुरस्काराचा फोटो चक्क उलटा छापण्यात आला आहे. या गंभीर चुकीचे पडसाद आज पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेत उमटले. विरोधकांनी या मुद्द्यावरून सभागृहात जोरदार घोषणाबाजी करत सरकारला धारेवर धरले. या प्रकरणी विरोधकांच्या आक्रमकतेची गंभीर दखल घेत, दोषींवर पुढील 24 तासांच्या आत कडक कारवाई केली जाईल, अशी मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली आहे.

महाराष्ट्र शासनाचे अधिकृत मुखपत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'लोकराज्य' मासिकाचा दर्जा आणि त्यातील माहिती अत्यंत अचूक असणे अपेक्षित असते. मात्र, नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंकात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेबाबत निष्काळजीपणा करण्यात आल्याचे समोर आले. मासिकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो आणि त्याचसोबत देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या 'भारतरत्न' पुरस्काराचा फोटो देखील उलटा छापण्यात आला.

विधीमंडळाच्या कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्षाच्या आमदारांनी हा मुद्दा सभागृहात अत्यंत आक्रमकपणे लावून धरला. "महामानवांचा असा अवमान राज्य सरकार कधीपर्यंत सहन करणार?" असा सवाल करत विरोधकांनी अध्यक्षांच्या समोरील जागेत येऊन जोरदार घोषणाबाजी सुरू केली. या गंभीर प्रकरणावर सरकारने सभागृहात तात्काळ अधिकृत निवेदन करावे आणि संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी आग्रही मागणी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी केली. यामुळे सभागृहाचे कामकाज काही काळ विस्कळीत झाले होते.

सभागृहातील वाढता गदारोळ आणि प्रकरणाचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्र्यांनी स्वतः यावर उत्तर दिले. मुख्यमंत्र्यांनी या प्रकाराबद्दल तीव्र खेद व्यक्त करत सरकार अशा चुकांचे कधीही समर्थन करणार नाही, असे स्पष्ट केले. "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या सर्वांचेच आराध्य दैवत आहेत. शासकीय मासिकात असा निष्काळजीपणा आणि एवढी मोठी चूक अत्यंत अक्षम्य आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून, जे अधिकारी किंवा कर्मचारी यासाठी जबाबदार असतील, त्यांच्यावर पुढील 24 तासांच्या आत कडक कायदेशीर आणि प्रशासकीय कारवाई केली जाईल," अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्र्यांच्या या आश्वासनानंतर सभागृहातील वातावरण शांत झाले.

## महाराष्ट्रातील समता चळवळीचे अध्वर्यू प्राचार्य राजाराम राठोड यांचं दु:खद निधन



**छत्रपती संभाजीनगर :** वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे माननीय अध्यक्ष, समाजभूषण प्राचार्य राजारामजी राठोड यांचे आज दिनांक ९ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता दीर्घ आजाराने दु:खद निधन झाले.त्यांचा अंत्यविधी उद्या दिनांक: १० जुलै २०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता वसंतराव नाईक महाविद्यालय परिसर, जालना रोड सिडको, छत्रपती संभाजी नगर येथे होणार आहे. मराठवाडा प्रदेशातील उच्चशिक्षण क्षेत्रातील एक अतिशय प्रभावशाली प्राचार्य , महाराष्ट्रातील समता चळवळीचे अध्वर्यू , वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबादचे संस्थापक सचिव , दुबळ्या घटकातील गोरगरीब मुलांचे आधारवड , भटक्यविमुक्तांची चळवळ , नामांतर लढा आणि अनेक प्राध्यापक कार्यकर्त्यांचे पाठीराखे , अतिशय मोहक व्यक्तित्वाचे धनी , उत्तम चिंतक प्राचार्य राजाराम राठोड यांचं निधन म्हणजे मराठवाड्यातील धगधगत्या शैक्षणिक नेतृत्वाचा अंत होणं होय. आता असे समाजधर्मी व गरीबहितैषि प्राचार्यांची वाणवा आहे. मूळ उदगीरच्या तांड्यावर जन्मलेले राठोड सर अभ्यासात हुशार , नांदेडच्या प्रागतिक शैक्षणिक वातावरणात फुललेलं व्यक्तित्व, समाजसेवेची मनस्वी आवड . यातून एक चिंतनशील प्राचार्य घडले. धाडसानं वसंतराव नाईक यांचे नावे महाविद्यालय औरंगाबादला मोठ्या जिद्दीनं उभा करतात नि हजारो गोरगरीब -वंचित - भटकेविमुक्त यांचं जीवनात परिवर्तन आणतात. एक कर्मवीर प्राचार्य काय करू शकतो याचा ते मूर्तिमंत उदाहरण बनतात. आदरणीय प्राचार्य राजाराम राठोड सरांना विनम्र आदरांजली..!

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जुलै २०२६

# "जगावेगळा बाप" - शेतकरी बापाच्या त्यागाला शब्दांकित श्रद्धांजली



**कन्नड :** कै. भिकाजीराव हुसे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शेतकरी पित्याच्या निस्वार्थ त्यागाला वंदन म्हणून लिहिलेले प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांचे "जगावेगळा बाप" हे पुस्तक आज शिवाजी महाविद्यालयात प्रकाशित झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले."जगावेगळा बाप" हे केवळ एक पुस्तक नसून, ते महाराष्ट्रातील कष्टकरी शेतकरी बापांचे जिवंत शब्दचित्र आहे. आपल्या वडिलांच्या जीवनातील संघर्ष, कष्ट, साधेपणा आणि मुलांसाठी केलेला अथक परिश्रम यांचे भावस्पर्शी वर्णन लेखकाने या पुस्तकात केले आहे.शिवाजी महाविद्यालयात झालेल्या या प्रकाशन सोहळ्याला महाविद्यालयातील प्रख्यात कवयित्री डॉ. प्रतिभा अहिरे,डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. विजय मातकर, प्रा. योगेश सोमवंशी, डॉ. बी. जी. देशमुख, श्री लवांदे प्राध्यापक, साहित्यिक आणि मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी पुस्तकाचे प्रकाशन करताना सांगितले की, "आजच्या धावपळीच्या युगात पित्याचे महत्त्व आणि शेतकऱ्यांचे जीवन आपण विसरत चाललो आहोत. 'जगावेगळा बाप' हे पुस्तक त्या विस्मृतीला फाटा देऊन नवीन पिढीला त्यांच्या मुळाशी जोडण्याचे काम करेल. प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांनी वैयक्तिक अनुभवातून सार्वत्रिक सत्य मांडले आहे." असे प्रतिपादन केले.या पुस्तकात लेखकाने आपल्या बापाच्या दैनंदिन जीवनातील लहान-मोठ्या प्रसंगांमधून शेतकरी जीवनातील वास्तव उलगडले आहे. ऊन-वारा-पाऊस न बघता शेतात राबणारा, स्वतः उपाशी राहून मुलांना शिकवणारा, आणि आपल्या स्वप्नांचा त्याग करून मुलांची स्वप्ने पूर्ण करणारा "बाप" कसा असतो, याचे हृदयस्पर्शी चित्रण यात आहे. असे मत डॉ. प्रतिभा अहिरे यांनी व्यक्त केले.प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांनी आपल्या मनोगतात सांगितले, "हा बाप फक्त माझा नव्हता, तर तो कष्टकरी, शेतकरी प्रत्येक कुटुंबातील बापाचे प्रतिनिधित्व करतो. त्यांच्या स्मृतींना आणि सर्व शेतकरी बांधवांच्या त्यागाला ही माझी छोटीशी श्रद्धांजली आहे."कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात लेखकाचे आणि पुस्तकाचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन महाविद्यालयातील डॉ. रामचंद्र झाडे त्यांनी केले.




# कालिकादेवी विद्यालयात,R.O.फिल्टर युक्त शीतपेय, जलकुंभाचा लोकार्पण व उद्घाटन सोहळा संपन्न




**शिरूर कासार :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित,कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरूर(का.)जि.बीड येथे अत्याधुनिक R.O.फिल्टरयुक्त शीतपेय जलकुंभाचे (वॉटर कुलर) प्रकल्पाचे लोकार्पण व उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष,प्राचार्य केशव भांगे साहेब,प्रमुख अतिथी मॅनेजर श्री वेन्सी डाबरे साहेब व मा.जयेशजी कासट यांच्या शुभहस्ते फित कापून या प्रकल्पाचे उद्घाटन करून,लोकार्पण करण्यात आले.ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री लक्ष्मीनारायण कासट,पत्रकार सतीश मुरकुटे यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले की,"शुद्ध पाणी म्हणजे निरोगी जीवनाचा पाया" या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आता फिल्टरयुक्त शुद्ध,स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे.'RR काबेल फाउंडेशन' यांच्या CSR निधीतून आणि निरंजन सेवाभावी संस्था यांच्या संकल्पनेतून आपल्या कालिकादेवी विद्यालयाला अत्याधुनिक R.O.फिल्टरयुक्त शीतपेय,जलकुंभ(वॉटर कुलर) प्रकल्प म्हणजे शुद्ध पिण्याच्या पाण्याची अमूल्य भेट आहे.असे त्यांनी सांगितले.तर प्रमुख अतिथी CSR मॅनेजर श्री वेन्सी डाबरे साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले की,'पाच लाख रुपये' किंमतीचा('वॉटर फिल्टर')हा प्रकल्प म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत हा उपक्रम राबविण्यात येत आहे.म्हणून विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे.हे त्यांनी स्पष्ट केले.तर पुणे येथील निरंजन सेवाभावी संस्थेचे,संस्थापक अध्यक्ष श्री जयेशजी कासट साहेब यांनी आपल्या भाषणातून प्राचार्य केशव भांगे साहेब यांचे भरभरून कौतुक करून विद्यालयाच्या नावलौकिकाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले.तसेच प्रा.महारुद्र डोंगरे यांनी प्रास्ताविकपर भाषणातून प्रकल्पाचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी होणाऱ्या फायद्याबाबत माहिती दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले.तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.याप्रसंगी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे,प्रा.नामदेव तरकसे तसेच सर्व प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची बहुसंख्येने उपस्थित होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जुलै २०२६


## धर्ममार्तंडांच्या विरोधात सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष : भारतीय स्त्रीशिक्षणाच्या क्रांतीचा पाया

मित्रांनो आज आपण एका नवीन विषयाकडे वळणार आहोत. हा विषय सर्वांचा आहे. प्रत्येक माणसाला महात्मा ज्योतिबा फुले सावित्री माता फुले,Dr.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवराय, राजमाता जिजाऊ अशा अनेक थोर महामानवांच्या इतिहासाबद्दल माहिती आहे. परंतु त्या विचाराला उजळा निर्माण व्हावा ते विचार जनसामान्यांच्या पर्यंत पोहोचावे प्रत्येक माणसाला सावित्री माता फुले यांनी केलेले कार्य माहीत व्हावं, कार्याची आणि विचाराची उजळणी होत राहावी.म्हणून भूमिपुत्र वाघ यांचा अटहास आहे.. भारतातील स्त्रीशिक्षणाचा इतिहास लिहिताना यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जात आहे.त्यांनी केवळ मुलींना शिक्षण दिले नाही, तर स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे, हा विचार प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर मांडला. त्या काळातील सनातनी विचारसरणी, धर्ममार्तंडांचा विरोध, सामाजिक बहिष्कार, अपमान, दगडफेक, शेणफेक आणि मानसिक छळ या सर्व संकटांना तोंड देत त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले. त्यांचा संघर्ष हा केवळ शिक्षणासाठी नव्हता, तर समता, न्याय आणि मानवतेच्या पुनर्स्थापनेसाठी होता. त्यामुळेच आज त्या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका आणि सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत म्हणून ओळखल्या जातात.एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजात स्त्रीला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. स्त्रीचे स्थान केवळ घरापुरते मर्यादित ठेवण्यात आले होते. जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि धार्मिक रूढींनी समाजाला जखडून ठेवले होते. अशा काळात सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मशाल पेटवली. हा निर्णय त्या काळातील समाजासाठी क्रांतिकारक होता. धर्माच्या नावाखाली विरोध करणाऱ्या मंडळींनी त्यांचा सातत्याने छळ केला, परंतु त्यांनी समाजहिताचा मार्ग सोडला नाही.धर्ममार्तंडांचा विरोधसावित्रीबाई शाळेत जात असताना अनेक लोक त्यांच्या अंगावर दगड, चिखल आणि शेण फेकत असत. त्यांना शिवीगाळ केली जात असे. समाजातून बहिष्कृत करण्याचा प्रयत्न झाला. त्यांचे कुटुंबही दबावाखाली आले. धर्म बुडेल, स्त्रिया शिक्षित झाल्या तर समाज नष्ट होईल, अशा अफवा पसरवल्या गेल्या.परंतु सावित्रीबाई दररोज अतिरिक्त साडी घेऊन घराबाहेर पडत. शाळेत पोहोचल्यावर मळलेली साडी बदलून त्या विद्यार्थिनींना प्रेमाने शिकवत असत. हा प्रसंग त्यांच्या मानसिक सामर्थ्याचा आणि कार्यनिष्ठेचा सर्वोच्च आदर्श आहे.संघर्षातून निर्माण झालेली क्रांतीसावित्रीबाईंनी मुलींसाठी शाळा सुरू केली. दलित, शोषित आणि वंचित समाजातील मुलांनाही शिक्षणाची दारे खुली केली. विधवांसाठी आश्रय, अनाथ मुलांची काळजी, स्त्रियांच्या सन्मानासाठी अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी राबवले. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा संदेश त्यांनी कृतीतून दिला.सामाजिक परिवर्तनातील योगदानआज भारतातील लाखो महिला शिक्षिका, डॉक्टर, अभियंते, न्यायाधीश, प्रशासकीय अधिकारी, वैज्ञानिक आणि उद्योजिका या सावित्रीबाईंच्या संघर्षाचे फळ आहेत. त्यांनी पेटविलेली शिक्षणाची ज्योत आज संपूर्ण देश उजळत आहे. स्त्रीशिक्षण हा आज मूलभूत अधिकार मानला जातो, यामागे त्यांच्या त्यागाचा मोठा वाटा आहे.धर्ममार्तंडांनी सावित्रीबाई फुले यांचा अमानुष छळ केला. त्यांना अपमानित केले, परंतु त्यांनी अन्यायापुढे कधीही हार मानली नाही. त्यांचे धैर्य, चिकाटी आणि समाजासाठीचे समर्पण यामुळेच त्या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या. त्यांचा संघर्ष हा प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे. समाजातील परिवर्तनासाठी विचार, शिक्षण आणि कृती यांची सांगड आवश्यक असते, हे त्यांच्या जीवनातून स्पष्ट होते.आज सावित्रीबाई फुले यांचे कार्य हे केवळ इतिहास नसून आधुनिक भारताच्या सामाजिक न्याय, स्त्रीसमानता आणि शिक्षणव्यवस्थेचा भक्कम पाया आहे. त्यांच्या संघर्षामुळे भारतीय समाजाला नव्या युगाची दिशा मिळाली. म्हणूनच प्रत्येक भारतीयाने त्यांच्या विचारांचे जतन करून शिक्षण, समता आणि मानवतेचा संदेश पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल...मग मला प्रश्न पडतो. शिक्षणापासून दलित आणि बहुजनांना बहिष्कृत करणारा धर्म आमचा कसा?? प्रश्न पडतो या जगाची निर्माता आई असेल ती जर अज्ञानी ठेवली गेली तर या देशाचा विकास कसा होईल? भारतीय संस्कृतीमध्ये आईला देवी म्हटलंआहे मग या धर्ममार्तंडानी त्याच आईला बहिष्कृत का केलं? दिन दलित बहुजन यांना शिक्षणापासून अंधारात का ठेवलं ? आजही अंधभक्त हाच विचार घेऊन मनुस्मृतीचा पुरस्कार करतात हे आपल्याला डोळसपणे दिसत नाही काय?? देवीच्या मंदिरामध्ये उघडे पुरुष पुजारी कसे? हे सुद्धा धर्म मार्तंडाचा बहुजणांना भावुकतेच्या, श्रद्धेच्या नावाखाली पीळणारा स्वतंत्र मार्ग आहे असे वाटत नाही का??.. पेटू दे रान आता मशाल तेवत ठेवू नवराष्ट्र निर्मानासाठी माय येकोप्याने पुढे जाऊ...


**लेखक : भूमिपुत्र वाघ**
**मो. ९१७२९ ७२४८२**


## महत्वाचं सांगतो ऐका

करू नका तिच्यासोबत,
चालता बोलता भांडण.
नाहीतर मुंडक तुमचं,
उकळात घालून कांडण. १

म्हणू नका कधी तिला,
टिकली तर टिकली.
नाहीतर समजा तुम्हाला,
बाजारात नेऊन विकली. २

तिच्यासोबत करू नका,
कधी मारामारीचा प्रकार.
नाहीतर तुमची करणार,
पोलीस स्टेशनला तक्रार. ३

देऊ नका तिच्यापुढे,
कधी मिशावरती ताव.
नाहीतर मिशी तुमची,
भादरून टाकेल राव. ४

रूमण्याला गुंडाळून,
ठेवतात काटेरी तार.
भाऊ तिचे पैलवान,
देतील तुला मुक्कामार. ५

पाहू नको कधी तिचे,
रौद्र दुर्गेचे अवतार.
सोडून देशील सारेच,
बिनकामी कारभार. ६

महत्त्वाचं सांगतो,
डोकं ठेव बाबा गार.
नाहीतर हातापायाला,
लागतील मार बार बार. ७


**- नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर***


## सदाफुली

सदाफुली किती
दिसते छान
पाहता क्षणी
हरपते भान

पांढरा गुलाबी
सुबक रंग
पाच पाकळ्यांचे
नाजूक अंग

हिरव्या पानात
शोभून दिसते
वाऱ्याला पाहून
मनाशीच हसते

बाराही महिने
बहरते छान
दुरून दिसते
चांदण्या समान

परस बागेला
करते शोभिवंत
गंध नसल्याची
मनी एक खंत




**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


## उद्या देवगिरीत आ.सतीश चव्हाण यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन...

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षेत फेब्रु./ मार्च 2026)कला ,वाणिज्य वविज्ञान या शाखेत गुणाानुक्रमे अव्वल ठरलेल्या विद्यार्थ्यांचा व राष्ट्रीय स्तरावरील जेईई,एमएचटी-सीईटी परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवलेल्या एकूण 78 गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्या शुभहस्ते दि. 10 जुलै 2026 रोजी महाविद्यालयाच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात दु. 12 वा. आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यासाठी नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. अपर्णा तावरे ,उपप्राचार्य डॉ.गणेश मोहिते, उपप्राचार्य प्रा.अरुण काटे, उपप्राचार्य प्रा.ज्ञानेश्वर हिवरे उपप्राचार्य प्रा. विजय नलावडे जेईई-नीट सेल संचालक प्रा.नंदकिशोर गायकवाड यांनी केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जुलै २०२६


## जेईएस महाविद्यालय जालना येथे ५ दिवशीय क्रीडा जनजागृती मोहीम

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे.ई.एस महाविद्यालय जालनाच्या क्रीडा विभागातर्फे ५दिवशीय क्रीडा जनजागृती मोहीम राबविण्यात आली असून यामध्ये विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडा प्रकाराचे गुण ओळखून आवडत्या क्रीडा प्रकार खेळाचे मार्गदर्शन केले जाते, याप्रसंगी प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री सर यांनी शहरातील विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील करिअर संदर्भात मार्गदर्शन केले क्रीडा संचालक प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांनी विविध क्रीडा प्रकार सांगून आवडत्या क्षेत्रात कसे प्राविण्य मिळवता येते या विषयाचे सविस्तर माहिती सांगितली. यावेळी उप प्राचार्य डॉ उमेश मोगले, क्रीडा विभागाचे डॉ.किशोर बिरकायलू प्रा. राहुल सारस्वत,राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे , प्रा.करण सातुरे, डॉ.यास्मिन शेख,तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.५ दिवसीय क्रीडा शिबिर यशस्वी होण्यासाठी श्री. विलास बोधले, श्री शामराव राठोड ,श्री घनश्याम मोदानी यांनी विशेष प्रयत्न केले

# आषाढी वारीतील "चरणसेवा" उपक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वी



**बीड (भगवंत पाळवदे)** : मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तथा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त आयोजित करण्यात आलेला "चरणसेवा" उपक्रम बुधवार, दि. 8 जुलै 2026 रोजी चिंतेश्वर मंदिर, गेवराई जि.बीड व टीपीएस कॉलनी परळी जिल्हा बीड येथे उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीपणे संपन्न झाला.मुक्ताईनगर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत मुक्ताबाई पालखी दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे सोबतच गजानन महाराज पालखी दिंडी शेगाव ही बीड जिल्ह्यात परळी या ठिकाणी मुक्कामस येते . या दिंडीसोबत महाराष्ट्रातील शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे जातात.वारकऱ्यांच्या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयराजे पंडित यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबईचे विशेष कार्य अधिकारी तथा कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक, डॉ. स्वानंद सोनार तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.या उपक्रमात सुमारे ७० स्वयंसेवकच्या चमूने 400 हून अधिक वारकऱ्यांना चरणसेवा व आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य तपासणी व आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले. तसेच फिजिओथेरपी, आयुष उपचार पद्धतीद्वारे सेवा आणि पंचकर्म उपचारही देण्यात आले. या सेवेमुळे पायी प्रवासामुळे आलेला शारीरिक थकवा दूर होऊन पुढील वारीसाठी नवचैतन्य आणि ऊर्जा मिळाल्याची भावना अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केली.दिंडीतील वारकऱ्यांनीही उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु माऊली आयुर्वेदिक महाविध्यलाय माळीपरगाव तालुका माजलगाव , आर बी अट्टल महाविद्यालय,गेवराई , जय भवानी महाविद्यालय गढी येथील NSS विध्यार्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड, यांचे मोलाचे सहकार्य लाभले.मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे, समन्वयक गणेश गिराम, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कदम , डॉ पिंगळे, गेवराई तालुका आरोग्य अधिकारी डॉ गोंदीकर अभय ,परळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ मोरे, अशोक लोखंडे यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेला प्राधान्य देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रभावी उदाहरण ठरला असून भविष्यातही अशा स्वरूपाचे उपक्रम अधिक व्यापक स्तरावर राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

## स्वप्न पाहताना जबाबदारीची जाणीव करून देणारा आरसा




**उदगीर** : बदलत्या काळाच्या आभासी झगमगाटाच्या अंधःकारात नैतिक मूल्य पायदळी तुडवली जात आहेत. गरिबी श्रीमंतीची दरी वाढून सामाजिक विघटन होत आहे. यातच मराठवाड्यातील अभावग्रस्त जग आणि मुंबईतल्या डान्सबारची चंगळवादि दुनिया, अशा परिस्थितीत आजच्या तरुणांना रंगीत स्वप्न पाहताना जबाबदारीची जाणीव करून देणारी साहित्यिक कृती म्हणजे आरसा ही कादंबरी होय असे मत अनिता खडके यांनी व्यक्त केले. चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत चालू असलेल्या व गेल्या पंधरा वर्षापासून सातत्यपूर्ण चालू असलेल्या वाचक संवादचे ३६४ वे पुष्प मैनाताई साबणे यांच्या अध्यक्षतेखाली आदर्श शिक्षिका अनिता खडके लातूर यांनी ईश्वरचंद्र हलगरे लिखित आरसा या कादंबरीवर संवाद साधून गुंफले. यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या, एकूण १४ प्रसंगाच्या माध्यमातून इतरांकडे पाहताना स्वतःकडे पहायला शिकवणारी आरसा ही कादंबरी आहे. आजचा तरुण व्यसनाच्या दलदलीत कसा फसतो हे सांगताना, डान्सबार, बारबाला व त्यांचे कुटुंब, रेड लाइट एरिया, तृतीयपंथीयांची लिंग बदलांची प्रक्रिया, ड्रग्स व वेश्याव्यवसायामुळे वाढणारी गुन्हेगारी, होणारे सामाजिक अधःपतन, यातील सहभागी राजकारणी, पोलीस, पत्रकार याबरोबरच त्यावर चालणार अर्थजगत हे सर्व सांगताना पडद्यामागचे दृश्य व वास्तव मांडत त्यात गुंतलेल्या यंत्रणेची पाळमूळ सर्वासमोर दृश्यमान करणारी आरसा ही कादंबरी असल्याचे मत व्यक्त केले. यानंतर उपस्थितांमध्ये सुंदर अशी चर्चा घडून आली. चर्चेनंतर उपस्थितितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना मैनाताई साबणे म्हणाल्या, नैतिक अनैतिकतेच्या दलदलीत सर्जनशीलतेची होणारी पडझड यांचे भेदक वास्तव या कादंबरीत मांडलेले आहे. आरसा स्वतः बदलत नाही तर तो बदलाची गरज दाखवतो इतरांचे जीवन पाहताना स्वतःकडे पाहायला शिकवतो. अत्यंत प्रभावी ठरलेल्या या वाचक संवादाचे सूत्रसंचालन मुरलीधर जाधव यांनी केले. संवादकांचा परिचय प्रा. सुरेश शिंदे बेंबरेकर यांनी करून दिला तर आभार आनंद बिरादार यांनी मांडले .

## मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे ICC अभिमुखता व संवेदनशीलता कार्यक्रम संपन्न




**छत्रपती संभाजीनगर** : मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटीच्या मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, रौजा बाग येथे मंगळवारी अंतर्गत तक्रार समितीच्या (ICC) अंतर्गत "अभिमुखता व संवेदनशीलता कार्यक्रम" आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या इमारत क्रमांक १ मधील हॉल क्रमांक ८ येथे पार पडला.विद्यार्थ्यांना ICC ची भूमिका व कार्यपद्धती समजावून सांगणे, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींबाबत जनजागृती करणे, तसेच महाविद्यालय परिसरात सुरक्षित, सन्मानजनक, सर्वसमावेशक व लिंग-संवेदनशील वातावरणास प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील प्रख्यात तज्ज्ञांकडून दोन सत्रे घेण्यात आली. सकाळी ११:०० ते १२:०० या पहिल्या सत्रात शिक्षणशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. अनिता लक्ष्मण फुलवाडे यांनी "ICC आणि कामाच्या ठिकाणी महिला संरक्षण" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी ICC चे कामकाज आणि कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ अंतर्गत तक्रार नोंदवण्याची कार्यपद्धती सविस्तरपणे विशद केली.दुपारी १२:०० ते १:०० या दुसऱ्या सत्राचे मार्गदर्शन लिंग व महिला अभ्यास विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. मंजुश्री लांडगे यांनी केले. त्यांनी "लिंग संवेदनशीलता" या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांना समाजाचे जबाबदार घटक म्हणून काम करण्यासाठी सक्षम होण्यावर भर दिला.हा कार्यक्रम प्रभारी प्राचार्य प्रा. शेख इम्रान रमजान आणि IQAC समन्वयक प्रा. कनीज फातेमा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ. खान झिनत मुजफ्फर होत्या. डॉ. शेख तेहमीना नाझ आणि शीबा अर्शी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हुमेरा बतूल यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. शेख कशेफा अंजुम यांनी केले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व बी.एड.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जुलै २०२६


## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे कै. दादा मनोहरराव कल्लावार स्मृतिप्रीत्यर्थ महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेचे आयोजन




**नागपूर :** शिवा संघटना व सेवा जनशक्ती पार्टीचे संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष सन्मा.धर्मात्मा प्रा. मनोहर धोंडे सर याच्या संकल्पनेतून व राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. अभय कल्लावार यांच्या प्रयत्नातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे वीरशैव साहित्याचे गाढे अभ्यासक व लेखक कै.दादा मनोहरराव कल्लावार यांचे स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी महात्मा बसवेश्वर व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात येते.या वर्षी सोमवार दि.१३ जुलै २०२६ ला दुपारी ४ वाजता विद्यापीठाचे दिक्षांत सभागृह,महाराजबागजवळ नागपूर येथे करण्यात आले आहे.व्याख्यानमालेचे पंधरावे पुष्प मा.श्री.पंकज वंजारे, संत साहित्याचे अभ्यासक व प्रबोधनकार, वर्धा हे "लोकशाही प्रस्थापनेत महात्मा बसवेश्वरांचे योगदान" या विषयावर गुंफणार आहेत. क्रांतीसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर हे १२ व्या शतकात होऊन गेलेले वीरशैव-लिंगायत धर्माचे महान प्रचारक व प्रसारक होत. विषमता, स्त्री-पुरुष समानता, स्त्रीयांना शिक्षण व अर्थकारण, दारिद्र्य, अंधश्रद्धा, कर्मकांड व अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा यावर आपल्या वचनांच्या माध्यमातनू प्रहार करून प्रस्थापीत धर्मसत्तेला आव्हान देण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी आपल्या प्रखर बुद्धीमत्तेच्या व ज्ञानाच्या द्वारे बाराव्या शतकात करून दाखवले श्रमाला व श्रमिकांना प्रतिष्ठा मिळवुन दिली. समाजवादाचे जनक समजले जाणारे कार्ल मार्क्स यांनी श्रमाचे महत्व सांगितले तर बाराव्या शतकात होऊन गेलेल्या महात्मा बसवेश्वरांनी श्रमाचे पावित्र्य सांगितले. स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने न्याय व हक्क दिले. त्यांना शिक्षण देऊन अर्थकारणात, समाजकारणात आणले. शास्त्रसंमत - सतीप्रथा व बालविवाहाला विरोध केला.आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला. संसदीयलोकशाहीव्यवस्थेचे प्रारुप असलेल्या 'अनुभव मंटपाद्वारे' सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यीक चळवळीला गती व दिशा देण्याचे महान कार्य महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात वचन साहित्याच्या माध्यमातून करून दाखविले. काळाच्या कितीतरी अगोदरचे विचार त्यांनी समाजाला दिले. धर्मसत्तेने निष्प्राण केलेल्या समाजाला मानवतेच्या तत्त्वज्ञानाने चालते-बोलते करण्याचे काम महात्मा बसवेश्वरांनी स्वतःचे बुध्दिमत्तेवर करून दाखविले. इ.स. ११३१ ते ११६७ हा त्यांचा जीवनकाळ. एवढे प्रचंड कार्य आपल्या ३६ वर्षांच्या जीवनकाळात करून दाखविले. प्रस्थापित धर्म व्यवस्थेच्या शोषणाच्या जबड्यात सापडलेल्या समाजाच्या मोठ्या वर्गाला त्यांनी बाहेर काढले. समता व मानवतेची शिकवन दिली.समाजाला चरित्रवान, नितीवान बनविले.महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेच्या आयोजनातुन त्यांचे अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्य, समता-बंधुता-मानवतेचा विचार सर्व समाज बाधवांपुढे नेण्याचा उद्देशआहे.यावर्षी सोमवार दि.१३जुलै २०२६ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या दिक्षांत सभागृहात दुपारी ४ वा. "लोकशाही प्रस्थापनेत महात्मा बसवेश्वरांचे योगदान" या विषयावर मा. श्री.पंकज वंजारे, संत साहित्याचे अभ्यासक व प्रबोधनकार, व्याख्यान मालेचे पंधरावे पुष्प गुंफणार आहेत. व्याख्याते मा.श्री. पंकज भोयर हे अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे वर्धा जिल्हाध्यक्ष आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु मा.डॉ.मनाली क्षीरसागर राहतील. प्र-कुलगुरु मा.डॉ.अखिलेश पेशवे, अभय कल्लावार, राष्ट्रीय उपाध्यक्ष शिवा संघटना, यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाला लाभणार आहे.समताधिष्ठीत विचारांचे जागरण करणाऱ्या महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेस वीरशैव-लिंगायत समाजबाधवांसह समता प्रेमी समाज बाधवांनी व शिवा सघटनेच्या कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवा संघटनेचे पुर्व विदर्भ विभाग अध्यक्ष गजानन बाजारे, सचिव अनिल तंबाखे, माजी जिल्हाध्यक्ष निवृत्त न्यायाधीश ॲड. प्र. आ. मार्कन्ड्येवार, वासंतीताई मार्कन्ड्येवार, शिवा महिला आघाडी जिल्हाध्यक्षा विजयश्रीताई ठोंबरे, महानगर अध्यक्षा सुकन्याताई थडकर, नागेश घोडकी, शिवकुमार पटणे, मंगलाताई साळेगांवकर, प्रा. सुषमा कल्लावार, श्यामभाऊ देऊळकर, बावणेकुणबी समाज संघटनेचे बाबाराव तमुसरे,दामोधर सामंत, चंदभुाऊ तिजारे, गुरूदेव युवामंचचे ज्ञानेश्वर रक्षक, बुद्धिष्ट मॅरेज सेंटरचे श्री. ऋषी मुन, रमेश वैद्य, विजयाताई बोटकावार, बबनराव औरंगपुरे, अरविंद भुते, सी.एस. ठाकरे, सुरेश हरणे, चंद्रप्रकाश मेनकुदळे, बब्बू शेख, गंगाधरजी कैकाडे इत्यादींनी केले आहे.

**अभय कल्लावार**
**(राष्ट्रीय उपाध्यक्ष)**

## देवगिरीहून श्री संत रामा जनार्दन स्वामी पालखीचे पंढरपूरकडे भक्तिमय प्रस्थान



**दौलताबाद (जावेद अहमद) :** आषाढी वारीच्या पावन पर्वानिमित्त श्रीक्षेत्र देवगिरी (दौलताबाद) येथून श्री संत रामा जनार्दन स्वामी महाराज यांच्या पवित्र पालखी सोहळ्याचे आज श्रीक्षेत्र पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. टाळ-मृदुंगाचा निनाद, हरिनामाचा अखंड गजर आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषात हा सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाला.जवळपास ५०० भक्त यात समावेश होणार आहेगेल्या तेवीस वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या पालखी सोहळ्याला काव्यतीर्थ, आचार्य, वेदांतवाचस्पती पूज्य श्रीगुरु जगन्नाथ महाराज पवार यांच्या पावन आशीर्वादाची प्रेरणा लाभली असून, जनताजनार्दनाच्या सहकार्यामुळे ही भक्तिपरंपरा अधिकाधिक समृद्ध होत आहे.या पालखी सोहळ्याचे प्रमुख चालक ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे तसेच देवगिरी चॅरिटेबल ट्रस्ट, देवगिरी-दौलताबाद यांच्या पुढाकारातून हा सोहळा यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.याप्रसंगी ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे, युवानेतृत्व करणारे ह.भ.प. नारायण महाराज कोरडे, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज इलग, ह.भ.प. आव्हाळे महाराज, भाजप चे शेख बने,उमेश आप्पा सदावर्ते, रामेश्वर गवळी, रावसाहेब कांजणे, सदाशिव आप्पा लकडे, डॉ.कैलास निकम,विष्णू अप्पा लकडे,प्रकाश बळी यांच्यासह अनेक मान्यवर, वारकरी, भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी पालखीचे पूजन करून वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. भक्ती, समता, सेवा आणि संतपरंपरेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणारा हा पालखी सोहळा वारकरी संप्रदायाच्या अखंड परंपरेचे प्रेरणादायी प्रतीक असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली."हरिनामाचा अखंड गजर, संतविचारांचा जागर आणि भक्ती-समतेचा संदेश घेऊन श्री संत रामा जनार्दन स्वामी महाराजांची पालखी आज देवगिरीहून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली."




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० जुलै २०२६


# गाडगेबाबा आणि आषाढी

आषाढीची वारी आली, दुमदुमला जयघोष सारा,
गाडगेबाबा म्हणती आधी, स्वच्छ करा हा देश सारा.

"पंढरीला तुम्ही गेलात, विठ्ठल भेटेल आनंदभर,
पण आधी चंद्रभागेला द्या स्वच्छतेचा सुंदर स्वर."

हातामध्ये खराटा घेऊन, दिला जनतेला संदेश,
स्वच्छ मन आणि स्वच्छ परिसर, हाच खरा भक्तीचा वेश.

नाही फुले, नाही हार, नाही मोठा दिखाऊ थाट,
सेवेमध्ये विठ्ठल भेटे, हाच बाबांचा जीवनपाठ.

चंद्रभागा स्वच्छ झाली, उजळला तिचा प्रत्येक काठ,
स्वच्छतेच्या त्या सेवेमुळे, फुलला भक्तीचा खरा घाट.

वारी म्हणजे चालणं नाही, वारी म्हणजे सेवेची वाट,
गाडगेबाबा शिकवून गेले, स्वच्छतेतच विठ्ठल दाट.


आजही बाबांचा संदेश, घुमतो गावोगावी भारी—
"स्वच्छ ठेवा चंद्रभागा, तेव्हाच सफल होईल वारी."

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# 'महिला लोककला महोत्सवा'तून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरांचा रंगोत्सव




**मुंबई (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावतीने 'महिला लोककला महोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन दि. ११ ते १३ जुलै २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ६.०० वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा, लोकसंस्कृती आणि महिला लोककलावंतांच्या कलाविष्काराला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या तीन दिवसीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्राची लोकसंस्कृती ही विविध लोककला, लोकपरंपरा, लोकसंगीत आणि लोकनृत्यांनी समृद्ध आहे. या परंपरांच्या जतन, संवर्धन आणि प्रसारामध्ये महिला कलाकारांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे. पारंपरिक लोककलांमधून सामाजिक मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि लोकजीवनाचे दर्शन घडविणाऱ्या या कलावंतांचा गौरव करण्यासाठी तसेच नव्या पिढीसमोर लोकसंस्कृतीचे वैभव प्रभावीपणे सादर करण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.'महिला लोकरंग महोत्सव' हा महाराष्ट्रातील विविध लोककलांचा रंगतदार संगम ठरणार असून त्यामध्ये मंगळागौर नृत्य, लावणी, एकतारी भजन, भारूड, गोंधळ, मुलखावेगळी गाणी तसेच शाहिरी अशा विविध लोककला प्रकारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. परंपरा, संस्कृती आणि लोककलेचे वैविध्य रसिकांना या महोत्सवातून अनुभवता येणार आहे.या महोत्सवामध्ये राज्यातील विविध भागांतील महिला लोककलावंत आपल्या सशक्त कलाविष्कारातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणार आहेत. लोकनृत्य, लोकसंगीत आणि पारंपरिक कलाप्रकारांच्या माध्यमातून ग्रामीण संस्कृतीचे सौंदर्य, स्त्रीशक्तीचा सहभाग आणि लोकजीवनातील सांस्कृतिक समृद्धी प्रभावीपणे उलगडली जाणार आहे.लोककला ही समाजप्रबोधन, लोकजागृती आणि सांस्कृतिक एकात्मतेचे प्रभावी माध्यम असून महाराष्ट्राच्या अस्मितेशी तिचे अतूट नाते आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून लोककला परंपरेचे संवर्धन, महिला कलाकारांना प्रोत्साहन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात येत आहे.सदर कार्यक्रम मा. ॲड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे जतन, संवर्धन आणि व्यापक प्रसार करण्याबरोबरच लोककला क्षेत्रातील महिला कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवित आहे.सदर कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून बीड जिल्ह्यातील कला रसिक, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या लोककला महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


# ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांचे पैसे विनाविलंब परत करण्यासाठी प्रक्रियेला गती द्यावी -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**बीड (भगवंत पाळवदे) :** ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रकरणाचा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष आढावा घेतला. या संस्थेच्या ठेवीदारांचे पैसे विनाविलंब आणि गतीने परत मिळण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया तातडीने राबवावी, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. यासाठी न्यायालयाला विनंती करून अधिसूचना काढण्याची प्रक्रिया वेगवान करण्याचे आदेशही त्यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटीचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे प्रत्यक्ष तर खासदार बजरंग सोनवणे, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्ञानराधा मल्टीस्टेटची जप्त करण्यात आलेली मालमत्ता आणि त्याचे प्रस्ताव नव्याने तयार करण्यात यावेत. या मालमत्तेचे एखाद्या नामांकित आणि प्रतिथयश संस्थेकडून पुनर्मूल्यांकन करून घ्यावे. हे मूल्यांकन करताना खासगी क्षेत्रातील निकषांप्रमाणे अचूक आणि पारदर्शक पद्धतीने केले जावे, जेणेकरून ठेवीदारांचे पैसे परत देण्याच्या प्रक्रियेला गती येईल.ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या एकुण जप्त मालमत्ता २५० स्थावर तर ७४ जंगम, ४० बँक खाती असून एकुण मुल्यांकन १७२.०३ कोटी रुपये आहे. जप्त केलेल्या मालमत्तेच्या लिलावास तातडीने मंजूरी मिळावी यासाठी बीड जिल्ह्यामध्ये स्वतंत्र न्यायालयाचा प्रस्ताव प्रमुख जिल्हा न्यायाधीशांनी मा.उच्च न्यालयात सादर केला आहे. पोलिस विभागाने जप्त केलेल्या मालमत्तांचे एकुण मुल्य ३९९.०३ कोटी इतके नमुद केले आहे. पोलिस विभागाने सदर मुल्य हे मुद्रांक विभागाच्या चालु वर्षाच्या शीघ्रसिध्द गणक पत्रकानूसार घेतले आहे. जप्त मालमत्तांच्या लिलाव करण्यापुर्वी त्यांचे मुल्यांकन व्यावसायिक मुल्यांकन कंपनीद्वारे केले तर मुल्यांकनामध्ये अंदाजे ४ पट वाढ होवू शकते. सुरेश कुटे समुहाने ठेवदारांच्या पैशाचा वापर करुन बँकांची फसवणूक कशी केली याचा प्रवाह ज्ञानराधा सोसायटीचे मुळ निधी ठेवीदार ३९०७६ असून सुरेश कुटे व त्यांचे निकटवर्तीयांना विनातारण व नियबाह्यारित्या कर्जाचे वाटप करण्यात आले. निधीचा वापर कुटे समुहाच्या कंपन्यांमध्ये केला या कंपन्यांनी या मालमत्ता विविध बँकांकडे तारण ठेवून प्रचंड कर्ज उचलले. आणि कर्ज थकीत झाल्यामुळे बँकांकडून एन.सी.एल.टी. प्राधिकरणाकडे दावे दाखल केले आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिली